ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 9 | MAY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ''वऱ्हाडातील किल्ले निर्मितीत नबाब ईस्माईलखान पन्हीचे योगदान''



प्रा. डॉ. प्रशांत प्रल्हादराव कोठे
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महा.
आकोट जि. अकोला.

## प्रस्तावना :-

वऱ्हाडला पूर्णपणे ऐतिहासिक महत्व आहे. अनेक शतकापार्यंत हा भाग सामाजिक, राजकीय आणि सास्कृतिक कार्याचे महत्वाचे राहीले आहे. या वऱ्हाडाने एक वेगळे वैशिष्टय वास्तुशास्त्रात निर्माण केले आहे. या वास्तुवरील शिलालेखावरून वऱ्हाडाच्या इतिहासाची कल्पना येते. वऱ्हाड मध्ये अचलपूर आणि गाविलगडचा किल्ला बहामनी काळात मुख्य ठिकाण म्हणून निर्माण झाला. या किल्ल्याचा सुभेदार फत्तेउल्ला इमाद–उल–मुल्क याने स्वतःचे राज्य इ.स.1490 मध्ये निर्माण केले. आणि 1574 मध्ये ते राज्य शेजारच्या अहमदनगरच्या निजामशाहीकडून जिंकून त्यात सामील झाले. 1596 मध्ये चांदबीबीच्या काळात वऱ्हाड मोगलांना मिळाला आणि पुढे १५० वर्षात मोगलांनी येथे सुभेदारांच्या माध्यमातून कारभार केला. पण निजाम–उल–मुल्क आसफजहा पहीला याने हैद्राबादला आपले स्वातंत्र राज्य निर्मान केले आणि वऱ्हाड त्याच्या राज्याचा एक भाग बनला. तो इ.स. १८५३ पर्यत त्याच्या ताब्यात होते. या कालखंडात वऱ्हाड मध्ये अनेक जुने स्मारके, इमारती निर्मान झाल्या. त्यावरून राज्यकत्यांचे वैभव आपनाला समजू शकते. अचलपूर शहराचा परकोट, दरवाजे, व बरळापूरचा किल्ला इ. हे वऱ्हाडच्या संरक्षणाच्या दृश्टीने फार महत्व आहे.

निजामाच्या अधिकारात येथील वऱ्हाडचे स्थानीक अधिकारी पन्ही अफगान यांचा अचलपूरच्या भागात व स्थानिक इतिहासात महत्वाचा सहभाग आहे. तो वऱ्हाडातील इमारती वास्तू वरून दिसुन येतो. ''वास्तुशास्त्राचे वैशिष्टय अफगाणानशिवाय झालेच नाही. ते त्यानी मर्यादीत आर्थिक बाजुच्या भरवशावर या अचलपूरचे महत्व वाढविले. कला व वास्तुशास्त्राच्या विकासाच्या अभ्यासात त्यांचा महत्वाचा वाटा आहे. येथील वास्तू, येथील सुभेदार, सरदारांनीच निर्माण केल्या आहे.''[1] त्यातील काही महत्वाच्या किल्ल्यांची माहीती पुढील प्रमाने देता येईल.

## अचलपूर भाहरा भोवतालचा परकोट :

''ऐतिहासिक शहर या दृष्टीने अचलपूरचे खास वैशिष्टय म्हणजे नबाब इस्मायखान याने बाधलेला गावाभौतालचा परकोट व त्याचे भव्य दरवाजे होय. या प्रवेश द्वारामधून जातांना एका ऐतिहासिक नगरीत प्रवेश करीत असल्याची सुखद जाणीव होते.''[2] नबाब इस्मायखनाने बाधलेल्या या परकोटाला हे शहर ऋणी आहे. इ.स. 1766–67 मध्ये या भिंतीचे काम सुरू झाले व ते सतत सात वर्षापर्यंत सुरू होते. ही भिंत दगड, खरप यांनी बांधली आणि इमादशाही राज्यकर्त्यांनी बांधलेल्या व नष्ट झालेल्या, पडलेल्या थडगे, इमारतीच्या दगडांनी बांधले. त्याची उंची 10.80 मीटर आणि रूंदी 3.60 मीटर एव्हढी आहे आणि त्याला पाच मुख्य दरवाजे असून ते वरून सुंदर शोभिवंत छत असनारे आहे.[3] हा परकोट बांधण्याचे कार्य इ.स.1775 पर्यंत चालेले होते.[4] या परकोटाच्या दुल्हा दरवाज्यावर लीहले आहे की, ''शहा रहमान याचे भक्तीचे कारण म्हणून हा दरवाजा बांधला आहे.[5] या दरवाज्यावर तीन लेख आहेत. त्यातील एक लेख मोगल बादशहा शहाआलम दुसरा व डाव्या बाजूच्या लेखात आसफ जहादुसरा याचा उलेख आहे. हे तीन लेख हीजरी सन 1180 म्हणजेच इ.स.1766–67 मधील असून

तीनही लेख पर्शियन भाषेत आहेत. त्यावरील लेखवरून हा दरवाजा संत शहा रहमान गाझी याच्या भक्तीचे प्रतीक म्हणून निर्माण झालेल्या तारखीचा आहे.[6] दुल्हा दरवाज्याच्या उजव्या बाजूच्या लेखात निजामाच्या दरबारातील नायब सुभेदार अलीफ खान याच्या विषयी गौरवपूर्ण उदगाराची नोंद आहे.[7] या दरवाज्याच्या डाव्या बाजूच्या लेखात इस्माईलखानचा उल्लेख आहे.[8]

याच परकोटाच्या दरवाज्या मध्ये नागपूरी दरवाजा आहे.त्याला टोनगाव दरवाजा म्हणतात. त्यावर लिहलेल्या लेखातील पर्शियन भाषेतील शब्द उल्लेखनीय आहे. ''हा दरवाजा नबाब इस्मायखान बहादूर यांनी हिजरी 1182 मध्ये नागपूरी दरवाजा बाधला''[9]

बुलंद दरवाज्यावर पर्शियन भाषेत पाच ओळी असलेला 46 x 44 सें. मी. आकाराचा लेख आहे.[10] या लेखाची तारीख हिजरी 1187 म्हणजेच इ.स.1773–74 होय.[11] या दरवाज्याच्या बाहेरील बाजूवर लीहले आहे की, याला नबाब इस्मायखान पन्हीने बांधला आहे.[12] या शिलालेखात इस्मायखान फथान लिहले आहे. तो पठान शब्द होय. अरबी मध्ये 'प' आणि 'ठ' शब्द नाही. भाषा तज्ञांनी या 'फथान' ला 'पठाण' लिहले आहे.''[13] त्या दरवाज्याच्या आतील भागावर 'बांदे–इ–जरफर' लिहले आहे.[14]

हिरपूरा दरवाज्यावर पर्शियन भाषेत दोन शिलालेख आहेत.[15] त्या शिलालेखा वरून दिसुन येते की, मोगल सम्राट शहाआलम दुसरा याच्या काळातील तो आहे. त्याच्या निर्मितीचे साल हिजरी 1880 म्हणजेच इ.स. 1766–67 होय.[16] या शिलालेखात इस्मायखान बहादूर पन्ही सुभेदार वऱ्हाड याच्या शहराची सीमा आणि दरवाज्याचा उलेख केला आहे.[17] अचलपूरचा किल्ला मजबूत करण्यासाठी आसफजहा याने नाजीम नायब इस्मायखान बहादूर यांना आज्ञा दिली व त्याचे निर्माण कार्य खुशबरखॉ या महसूली अधिकाऱ्याकडे देऊन त्याच्या देखरेखीली त्याचे काम पूर्ण करण्यात आले.[18]

मलीपूरा दरवाज्यावर डाव्या व उजव्या बाजूला दोन पर्शियन शिलालेख आहेत. तो शिलालेख आसफजहा दुसऱ्याच्या काळातील असुन त्यावरील साल हिजरी 1184 म्हणजेच इ.स.1770–71 मधील आहे. या दरवाज्याच्या डावीकडील लेखात या मालीपूरा दरवाज्याच्या बांधकामाची नोंद आहे. जे निजामअलीखान बहादूर आसफजहा दूसरा, नबाब इस्मायखान बहादूर हा वऱ्हाडचा सुभेदार असून अचलपूर परगण्याचा अमील (महसूल अधिकारी) खुशबरखानच्या देखरेखीखाली झाले आहे. या दरवाज्याच्या उजवीकडील शिलालेखावरून यात धार्मिक लिखाणाची नोद त्या मध्ये आली. आणि अब्दूल रहमान गाझी यांच्या नावाचे व दरवाजा बांधल्याच्या सालाचे लिखाण आहे.''[19]

## बाळापूरचा किल्ला:–

मुगल काळात बाळापूर वऱ्हाडात अचलपूर नंतरचे एक महत्त्वाचे लष्करी केंद्र होते. येथे मोगल काळात अनेक अधिकारी राहीले. ''येथे अस्तित्वात असलेला किल्ला औरंगजेबाचा मुलगा मुहम्मद आजम याने इ.स. १७२१ मध्ये बांधण्यास सुरवात केली.''[20] तो मातीच्या बांधकामाचा होता. ''सध्याचा बाळापूरचा किल्ला हा इ.स. १७५७ मध्ये एलिचपूर (अचलपूर) चा नबाब इस्मायलखान याने बांधला.''[21] हा किल्ला बांधकाम शैलीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. ''हा किल्ला नदी संगमावर असून किल्ल्याच्या बाहेर दोन कोट आहे.''[22] किल्ल्याचे बुरुज आणि िती ह्या व्य आणि मजबूत आहेत आणि ते किल्ला ज्या काळात बांधला त्या कालावधीतले उत्कृष्ट असे विटांचे बांधकाम आहे. बाहेरचा किल्ला किंवा खालचा किल्ला दशकोनी असून प्रत्येक कोनात एक बुरुज आहे आणि त्याच्या आत सर्व बाजू पासून एक पंचकोनी असा आतला किल्ला आहे. ज्याच्या प्रत्येक कोणात एक बुरुज आहे. दोन्ही किल्ल्यांच्या प्रवेश द्वारावर मुगल शैलीची छाप (प्र ाव) दिसते.[23] ''हा किल्ला मेळघाटातील गडकोट वगळता वऱ्हाडातील सर्वात मजबूत आणि मोठा किल्ला आहे.''[24] तो मन आणि म्हैस या नद्यांमधील उंचवट्यावर आहे. पावसाळ्यात तो पूर्णपणे पाण्याने वेढलेला असतो. फक्त एक ठिकाण कोरडे राहते. तेथून किल्ल्यात जाण्याचे मार्ग आहे. त्या दाराला हत्तीचा सामना केला जाण्यासाठी लोखंडी मोठे दाते आहे. सर्वात आतल्या दारावर हत्ती आणि घोडे यांचे चित्र आणि फुले असून ते दगडात कोरले आहे. ''या किल्ल्याच्या आत एक मशीद आणि तीन विहीरी आहे. सर्वात मोठी आणि आतली ित ही १० फुट जाडीची आहे आणि मधेमधे वेगवेगळ्या कोनात शस्त्रांसाठी मोठी छिद्रे केली आहेत.''[25]

**निष्कर्ष :—**

पन्ही मेहदवी नबाबांना बांधकामाची आवड हौसेपोटीच होती असे नाही तर लष्करी संरक्षणाची आवश्यकता विचारात घेऊन देखील बांधकामे करण्याचे त्यांना शहाणपण होते. नबाब इस्मायलखान पन्हीने राजधानी सुरक्षित करण्यासाठी एलिचपूरला तटबंदी केली तसा बाळापूरला एक स्वतंत्र किल्ला बांधला. नैत्येकडील प्रदेशावर लक्ष ठेवणे सोयीचे व्हावे म्हणून कार ाराचे उपकेंद्र बाळापूर या ठिकाणी सुरु केले व त्याच्या रक्षणासाठी हा किल्ला उपयुक्त ठरला. हे पुढील अनेक घडामोडी वरून दिसून येते. जसे निजामाचे प्रसिद्ध सरदारापैंकी जफीरूद्दवला धवसा व मीर मुसाखाँ रूकनुद्दवला हे इस्माईलखानचा फार मत्सर करीत असत. त्यांनी निजामाला इस्माईलखान विरूध चिथावल्याने निजामाने मीर मुसाखाँ व जफीरउद्दौला धवसा यांच्या हाताखाली सैन्य देऊन त्यांना एलिचपूरावर पाठविले. हे लष्कर हैद्राबाद—हिंगोली—वाशिम—कारंजा (लाड)या मार्गाने वऱ्हाडात आले. बाळापूर येथे किल्लेदार ठेवण्याची प्रथा पाडली होती. या किल्यावर इस्माईलखानने यावेळी करीमखाँ नावाचा पठान सरदार आपल्या तर्फे नेमला होता. निजामाचे मोठे सैन्य पाहून युक्तीने हे संकट टाळण्याचे त्याने ठरविले. त्याने मीर मुसाखाँस सांगीतले की, एलिचपूर ताब्यात घेतल्यास त्या बरोबरच त्या खालील मुलूखही ताब्यातामार्गाने बाळापूर या ठिकाणी आले. बाळापूरचा किल्ला इस्माईलखान पन्हीने बांधला होता. तेव्हा पासून त आल्यासारखाचा आहे. मग बाळापूर घेण्याची गरज तरी काय आहे. बाळापूर घेतल्याने अथवा न घेतल्याने तुमच्या एलिचपूरच्या मोहिमेत काही कमी जास्त होत नाही. हा युक्तीवाद मीर मुसाखाँला पटल्याने त्याने बाळापूर वरून सैन्य घेऊन एलिचपूरला आला. आणखी दुसरा प्रसंग असा की, मुधोजी भोसलेने निजामाचा पूर्वेकडील प्रदेश बळकावला होता. आणि त्यामुळे इस्मायलखानच्या शत्रूंनी निजामास इस्मायलखानच्या विरोधी सांगितलेल्या गोष्टी खऱ्या वाटू लागल्या. त्यावेळी निजामाने ठरवले की आपण स्वतः जाऊन भोसल्यांचा व आपल्या विरुद्ध बंड करणारा आपलाच सरदार इस्मायलखान याचा बंदोबस्त करावा. असा निश्चय करुन निजामाने इ.स. १७७५ च्या सुरवाती—सुरवातीला हैद्राबादवरुन वऱ्हाडच्या दिशेने कुच केले.

पूर्वीप्रमाणे हे लष्कर हैद्राबाद—हिंगोली—वाशिम—कारंजा (लाड) मार्गे बाळापूरला आले. बाळापूरच्या किल्ल्याजवळ हे लष्कर येताच किल्लेदाराने आपण मालकाशी प्रामाणिक आहे हे दाखविण्यासाठी किल्ल्याच्या किल्ल्या निजामाकडे पाठविल्या. त्यामुळे निजामाने त्या किल्ल्या पुन्हा बाळापूरच्या किल्लेदाराकडे परत पाठविल्या. त्यानंतर हे लष्कर पुर्वी नागपूरकर भोसल्यांनी निजामाचा पूर्वेकडे घेतलेला मुलूख परत मिळविण्यासाठी त्या दिशेने निघाला. निजाम बाळापूरवरुन अकोला, दहीहांडा, दर्यापूर आणि बाभळी वर अधिकार करुन पुढे तो भोसल्यांवर चालून गेला व भोसल्यांचा अमनेरचा किल्ला सर केला.

वरील संदर्भावरून असे दिसून येते की, वऱ्हाडच्या संरक्षणाच्या दृष्टीने बाळापूरचा किल्लाही महत्वाचा होता. वऱ्हाडची राजधाणीवर येणारे संकट काही प्रमाणात थांबविण्याच्या दृष्टीने या ठिकाणचे महत्व ओळखुन त्या ठिकाणी किल्ला बाधला. तसेच राजधाणीच्या रक्षनाच्या दृष्टीने अचलपूर भौवती परकोट बांधला.हे अचलपूरच्या नबाब इस्मायखान पन्हीची दूरदृष्टीचे प्रतीक दिसून येते. तसेच वऱ्हाडच्या संरक्षणाच्या दृष्टीने अचलपूरचा परकोट व बाळापूरचा किल्ला बांधून महत्वाची भर टाकली आहे. हे दिसून येते.

**संदर्भः**

1) Desai Z.A., Epigraphia India -1975, p.56
2)प्राचार्य राजा महाजन, ऐतिहासिक अचलपूर, तरून भारत, 3 जुलै 1986.
3)Desai Z.A., Epigraphia India -1975, p.56
4) रब्बानी, अचलपूर तारीख और तखाफत, पृ.क्र. 52.
5)महमद मेहताबखॉं, तजकेरा—ए—रहमानी पृ.क्र. 47.
6) Quddusi M.Y., Inscription Listed in the Annual Report in Indian Equgraphy of ASI 2000-01, 900, p. 95.
7) Quddusi M.Y., Inscription Listed in the Annual Report in Indian Equgraphy of ASI 2000-01, 901, p. 95.
8) Quddusi M.Y., Inscription Listed in the Annual Report in Indian Equgraphy of ASI 2000-01, 902, p. 95.

9) महमद मेहताबखॉं, तजकेरा–ए–रहमानी पृ.क्र. 48
10)Desai Z.A., Epigraphia India -1975, p.61.
11) Quddusi M.Y., Inscription Listed in the Annual Report in Indian Equgraphy of ASI 2000-01, 906, p. 96.
12) महमद मेहताबखॉं, तजकेरा–ए–रहमानी पृ.क्र. 48
13)Desai Z.A., Epigraphia India -1975, p.61.
14) महमद मेहताबखॉं, तजकेरा–ए–रहमानी पृ.क्र. 48
15)Desai Z.A., Epigraphia India -1975, p.58., रब्बानी, अचलपूर तारीख और तखाफत, पृ.क्र. 44.
16) Quddusi M.Y., Inscription Listed in the Annual Report in Indian Equgraphy of ASI 2000-01, 898,899, p. 95. ,Desai Z.A., Epigraphia India -1975, p.58.
17) रब्बानी, अचलपूर तारीख और तखाफत, पृ.क्र. 44.
18) Quddusi M.Y., Inscription Listed in the Annual Report in Indian Equgraphy of ASI 2000-01, 898,899, p. 95. ,Desai Z.A., Epigraphia India -1975, p.58.
19) Quddusi M.Y., Inscription Listed in the Annual Report in Indian Equgraphy of ASI 2000-01, 898,899, p. 95. ,Desai Z.A., Epigraphia India -1975, p.58.
20) जोशी, मराठी विश्वकोष, खंड 11, पृ. क्र. 541.
21) Akola District Gazetteer, p. 61 and 310.
जोशी, मराठी विश्वकोष, खंड 11, पृ. क्र. 541.. काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. 355.
22) जोशी, मराठी विश्वकोष, ख्खंड 11, पृ. क्र. 541.
23) Akola District Gazetteer, p. 61.
24) Akola District Gazetteer, p. 310.
25) Akola District Gazetteer, p. 310.